# १०० वर्षांनंतरचा विचार नको

हवामानबदलाची आताची स्थिती पाहता ते रोखण्यासाठी सध्या तरी आपल्या हाती विशेष काही उपाय नाहीत. त्यामुळे काही उपाय पुढील पिढीच्या भरवशावर सोडावे लागतील. म्हणजे पुढील पिढी नव्या प्रकारचे काही तरी तंत्रज्ञान विकसित करेल व हवामानबदलाच्या समस्येतून मार्ग काढणे सोपे बनेल. पण समजा पुढील पिढीला असे तंत्रज्ञान विकसित करता आले नाही तर? तर मात्र परिस्थिती अतिशय कठीण असेल आणि पुढील काळात म्हणजे साधारणतः शंभर वर्षांत किंवा त्यानंतर हवामानातील बदलांमुळे जीवसृष्टीला व माणसालासुद्धा बऱ्याच गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. अशाप्रकारच्या काहीशा निराशेच्या वातावरणात काहीजण असे म्हणतात की, पुढील १००-२०० वर्षांचा विचार कशासाठी करायचा? सध्या तरी आपण व्यवस्थित आहोत ना, मग कशाला हवी उद्याची चिंता? पुढे नैसर्गिक घटनांमुळे कदाचित अचानक असे काहीतरी बदल होतील की आपली काळजीच मिटेल. त्यामुळे इतक्या पुढे काय होणार या गोष्टींची चर्चा करत बसण्यापेक्षा आपल्या आयुष्यात व सध्याच्या काळात असलेल्या समस्यांचा सामना करू या. गरिबीतून जगाची सुटका, सर्वांना चांगले राहणीमान, अन्न-पाण्याची पुरेशी उपलब्धता, शिक्षणाचा प्रसार, आरोग्याच्या चांगल्या सुविधा पुरविणे अशा मूलभूत गोष्टींकडे लक्ष देऊ या. कारण १०० वर्षांनंतरच्या काळाचा विचार करून आपण आता या गोष्टींकडे दुर्लक्ष करत आहोत. त्यामुळे आताच्या गरजासुद्धा अपुऱ्याच राहात आहेत. म्हणूनच तातडीने करावयाच्या गोष्टींवरच भर देऊन त्यांच्यात सुधारणा करू या आणि इतर गोष्टी काळावर सोडू या, असेसुद्धा विचार व्यक्त केले जात आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे या माध्यमातून 'वर्तमानात जगा' हा संदेश देण्यात येत आहे. आता आपण ठरवायचे आहे वर्तमानात जगायचे की कसे?



प्रश्न- पुढचा विचार करण्यापेक्षा जगातील आताच्या कोणत्या समस्या सोडवाव्यात असे काही अभ्यासक सुचवित आहेत?

(उत्तर- रविवार, १४ डिसेंबरच्या अंकात)



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
लोकसत्ता गाथा ज्ञानाची




कागदाच्या निर्मितीसाठी
अशी होते पर्यावरणाची हानी

एक टन कागदाच्या निर्मितीसाठी १७ झाडे
आणि सुमारे ३१५०० लीटर पाणी लागते.
त्याशिवाय ग्लास आणि स्टील निर्मितीपेक्षा जास्त वीज लागते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in

दर गुरुवारी सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका.